दिनेश
बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक १२ । सोमवार २८ सप्टेंबर २०२६ । पाने ४ मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

## दुबार नावे हटवण्यासाठी एसआयआर गरजेचे- उपमहापौर धनंजय जाधव

**काँग्रेसचे आंदोलन दिशाभूल करणारे । एसआयआर विरोधातील आंदोलन म्हणजे फेक नॅरेटिव्ह; भाजपचा काँग्रेसवर आरोप । मतदार यादी शुद्धीकरण प्रक्रियेवर अविश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न; पत्रकार परिषदेत धनंजय जाधव यांची टीका**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** विशेष संक्षिप्त पुनरिक्षण प्रक्रियेच्या विरोधात काँग्रेस आणि विरोधी पक्षांकडून देशभर सुरू असलेले आंदोलन हे जनतेची दिशाभूल करणारे असून मतदार यादी शुद्धीकरण प्रक्रियेला बदनाम करण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप भाजपचे उपमहापौर धनंजय जाधव यांनी केला. अहिल्यानगर येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी नगर विधानसभा एसआयआर प्रमुख बाबासाहेब सानप उपस्थित होते.



यावेळी बोलताना जाधव म्हणाले की, मतदार यादीतील दुबार नावे, स्थलांतरित मतदार तसेच अपात्र नोंदी दूर करण्यासाठी ही प्रक्रिया राबविण्यात येत आहे. एका मतदाराला एकाच ठिकाणी मतदानाचा अधिकार असून अनेक ठिकाणी नागरिकांची नावे दोन-दोन मतदारसंघांत असल्याची उदाहरणे आढळून आली आहेत. त्यामुळे मतदार यादी अधिक अचूक व पारदर्शक करण्यासाठी ही मोहीम आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

काँग्रेस व विरोधी पक्षांकडून फेक नॅरेटिव्ह तयार करून देशातील वातावरण बिघडविण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप करत जाधव म्हणाले की, निवडणुकांमध्ये अपयश आल्यामुळे लोकशाही प्रक्रियेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. मतदार यादी शुद्धीकरणाच्या प्रक्रियेला विरोध करण्याऐवजी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

## मनाने स्वच्छ, लोकाभिमुख भूमिका असलेले नेतृत्व हरपले - प्रा. राम शिंदे

**स्वर्गीय माजी आमदार अरुणकाका जगताप यांना मरणोत्तर समाजरत्न पुरस्कार । मराठा सेवा संघ व मराठा सहकारी पतसंस्थेचा उपक्रम; विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** मनाने स्वच्छ, घेतलेली भूमिका आणि लोकाभिमुख राहिलेले नेतृत्व म्हणून स्वर्गीय माजी आमदार अरुणकाका जगताप यांची ओळख होती. त्यांनी समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन काम केले. त्यांचे अल्पवयात झालेले निधन सर्वांसाठी वेदनादायी असून, असे लोकाभिमुख नेतृत्व आज आपल्यामध्ये नसल्याचे दुःख आहे, असे प्रतिपादन विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी केले.

मराठा सेवा संघ व मराठा सहकारी पतसंस्था, अहिल्यानगर यांच्या वतीने सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्यात आला. याच कार्यक्रमात स्वर्गीय माजी आमदार अरुणकाका जगताप यांना 'समाजरत्न पुरस्कार' मरणोत्तर प्रदान करण्यात आला. सभापती प्रा. राम



शिंदे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

यावेळी आयुर्वेद शास्त्र सेवा मंडळाचे अध्यक्ष ॲड. सचिन जगताप, महापौर ज्योतीताई गाडे, कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. विजयकुमार ठुबे, सेवानिवृत्त सचिव सुनील चव्हाण, डॉ. श्रीमंत कोकाटे, मंगेश सुरवसे, किशोर मरकड, उदय अनभुले, इंजि. प्रवीण दहातोंडे, सतीश इंगळे आदींसह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रा. राम शिंदे म्हणाले की, मराठा सेवा संघाने समाजामध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्यासाठी पुढाकार घेतला असून, कर्तृत्ववान व्यक्तींचा माझ्या हस्ते सन्मान करण्यात आला. स्वर्गीय अरुणकाका

■ पान ४ वर

## भिंगारला २ एफएसआयची मंजुरी

**लोकसभेतील डॉ. सुजय विखे पाटील यांच्या पाठपुराव्याला यश । भिंगारवासीयांच्या वर्षानुवर्षांच्या मागणीला मिळाली दिशा; बांधकामाच्या मर्यादा दूर होण्याचा मार्ग मोकळा**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** भिंगार कँटोन्मेंट परिसरातील नागरिकांच्या वर्षानुवर्षांच्या प्रलंबित प्रश्नाला आता महत्त्वपूर्ण दिलासा मिळाला आहे. भिंगार कँटोन्मेंट बोर्डाच्या कार्यक्षेत्रात २ एफएसआयला मंजुरी देण्यात आली असून, संरक्षण मंत्रालयाने यासंदर्भातील सुधारित राजपत्र अधिसूचना जारी केली आहे. या निर्णयामुळे भिंगारमधील बांधकामाच्या मर्यादा मोठ्या प्रमाणात शिथिल होण्याचा मार्ग मोकळा झाला असून, हजारो मालमत्ताधारकांना त्याचा लाभ होणार आहे.पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, डॉ. सुजय विखे पाटील आणि आमदार संग्राम जगताप यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला या निर्णयामुळे यश मिळाले आहे. त्यामुळे भिंगारमधील बांधकामाच्या मर्यादा शिथिल होण्याचा मार्ग मोकळा झाला असून, हजारो मालमत्ताधारकांना दिलासा मिळाला आहे.

भिंगारमधील नागरिकांना एफएसआय, बांधकामासाठी आवश्यक परवानग्या आणि इतर विविध अडचणींचा सामना करावा लागत असल्याचा मुद्दा तत्कालीन खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी ७ डिसेंबर २०२३ रोजी लोकसभेत उपस्थित केला होता. भिंगार कँटोन्मेंटमध्ये सुमारे २५ हजार नागरी लोकसंख्या राहत असून, कँटोन्मेंटच्या नियमांमुळे नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्यांकडे त्यांनी सभागृहाचे लक्ष वेधले होते.

विशेषतः एफएसआयची मर्यादा, बांधकामासाठी एनओसी, पाणीपुरवठा तसेच केंद्र सरकारच्या योजनांच्या अंमलबजावणीतील अडचणी यांचा त्यांनी लोकसभेत उल्लेख केला होता. भिंगार कँटोन्मेंटमधील नागरी लोकसंख्येच्या समस्यांवर कायमस्वरूपी तोडगा काढण्याची गरज व्यक्त करताना, कँटोन्मेंट क्षेत्र अहिल्यानगर महानगरपालिकेत समाविष्ट करण्याची प्रक्रियाही तातडीने पूर्ण करण्याची मागणी त्यांनी संरक्षण मंत्रालयाकडे केली होती. लोकसभेत हा प्रश्न उपस्थित केल्यानंतरही डॉ. सुजय विखे पाटील यांनी भिंगारच्या प्रश्नांकडे सातत्याने लक्ष दिले. एफएसआयचा प्रश्न हा केवळ बांधकामाचा विषय नसून, भिंगारमधील हजारो कुटुंबांच्या दैनंदिन जीवनाशी आणि भविष्यातील गरजांशी संबंधित असल्याची भूमिका त्यांनी मांडली होती.

■ पान ४ वर

जिल्हा बँकेच्या चेअरमनपदाची चर्चा

## मुख्यमंत्री ज्याला योग्य समजतील, तोच चेअरमन होईल - विखे पाटील

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** जिल्हा बँकेच्या संदर्भात माझ्या नावाची चर्चा सुरू आहे, हे माझ्याही कानावर येत आहे. मात्र, माझ्या विरोधात कोण आहे, मला कोणाचा त्रास आहे किंवा माझा कोणाला त्रास आहे, याची मला कल्पना नाही.

माझ्या नावावर शिक्कामोर्तब व्हावं यासाठी मी कुठेही धावत नाही. मी कधीही म्हटलं आहे का की, मी जिल्हा बँकेचा चेअरमन होणार आहे? माझी भूमिका अगदी स्पष्ट आहे माननीय मुख्यमंत्री महोदय ज्याला योग्य समजतील, तोच व्यक्ती जिल्हा बँकेचा चेअरमन होईल. माझा सध्या जिल्हा बँकेच्या चेअरमनपदासाठी कोणताही संघर्ष किंवा प्रयत्न सुरू नाही. माझे प्रयत्न वेगळ्या दिशेने सुरू आहेत. जागतिक स्तरावर, विशेषतः वर्ल्ड बँकेसारख्या संस्थांमध्ये काही संधी मिळू शकते का, यासाठी मी प्रयत्न करत आहे. देशाच्या आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर आपल्याला काही काम करण्याची संधी मिळते का, हे मी पाहत आहे. त्यामुळे जिल्ह्याच्या राजकारणात मुख्यमंत्री महोदय जो निर्णय घेतील, तो मला मान्य असेल. हीच माझी कालची भूमिका होती आणि आजही तीच भूमिका आहे.

दौंड येथे इनामी जमीनधारक मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद : नगरसह राज्यभरातून प्रतिनिधी उपस्थित

## देवस्थान इनामधारकांना न्याय मिळेपर्यंत संघर्ष करत राहणार - प्रा. लक्ष्मण हाके

**मागणी मान्य न झाल्यास सामूहिक आमरण उपोषण करणार : ॲड. अण्णासाहेब शिंदे । देवस्थान इनाम जमीन कृती समितीच्या मेळाव्याला प्रचंड यश**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** देवस्थान इनाम जमीन कृती समितीच्यावतीने आयोजित महामेळावा बोरमलनाथ संस्थान (ता. दौंड) येथे संपन्न झाला. यावेळी झालेल्या सभेत व्यासपीठावर ओबीसी नेते प्रा. लक्ष्मण हाके, गुरव समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. अण्णासाहेब शिंदे, परशुराम हिंदू सेवा संघाचे श्री. विश्वजीत देशपांडे, दशनाम गिरीगोसावी समाजाचे श्री. ओमप्रकाश गिरी, मराठवाडा इनाम हक्क परिषदेचे ॲड. राजेंद्र बन, बोरमलनाथ देवस्थानचे श्री. आबा शेलार, नगरसेवक शीतल शिंदे, डॉ. संजय सुपेकर यांच्यासह ब्राह्मण, गुरव, गिरीगोसावी, गोंधळी, घडशी, बैरागी, लिंगायत अशा विविध



समाजांतील इनामधारक संघटनांचे नेते उपस्थित होते.

ओबीसी नेते प्रा. लक्ष्मण हाके यावेळी म्हणाले, गावागावातील छोट्या समाजातील देवाची सेवा करणार्या घटकांना न्याय देणे अत्यंत आवश्यक आहे. विविध शासकांनी दिलेल्या इनाम जमिनी हा त्यांचा अधिकार आहे व त्यांना तो मिळालाच पाहिजे. त्यासाठी या समाजांसोबत मी खंबीरपणे उभा राहील.

गुरव समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. अण्णासाहेब शिंदे म्हणाले, सरकारने देवस्थान इनाधारक शेतकर्यांना वार्यावर सोडले आहे. शासनाने जून महिन्यात तयार केलेल्या इनाम जमीन निर्मूलन कायद्याच्या मसुद्यातून सरकारची भूमिका आम्हाला

■ पान ४ वर

कथित गांजा कारवाईतील विसंगतींची गंभीर दखल

## चार पोलीस कर्मचाऱ्यांची तडकाफडकी बदली

**शाकीर शेख यांच्या पुराव्यानिशी तक्रारीनंतर चौकशीला वेग; आता उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्याची तयारी**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** कोतवाली पोलीस ठाण्यात दाखल गुन्हा रजिस्टर क्रमांक ६५९/२०२६ मधील कथित एनडीपीएस कारवाईबाबत सामाजिक कार्यकर्ते शाकीर शेख यांनी पुराव्यांसह केलेल्या गंभीर तक्रारीनंतर वरिष्ठ पातळीवर चौकशी सुरू झाली आहे. या प्रकरणाशी संबंधित चार पोलीस कर्मचाऱ्यांच्या तातडीने अन्य पोलीस ठाण्यांत बदल्या करण्यात आल्या आहेत.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी २६ सप्टेंबर २०२६ रोजी काढलेल्या आदेशानुसार पोलीस कर्मचारी रोहिणी अशोक दरंदले यांची भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात, दीपक भानुदास रोकले यांची बेलवंडी पोलीस ठाण्यात, पल्लवी सुभाष रोकले यांची भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात, तर अतुल केशव काजोळ यांची सुपा पोलीस ठाण्यात तात्पुरती बदली करण्यात आली आहे. चौकशी प्रक्रियेत कोणताही अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी या कर्मचाऱ्यांनी पुढील आदेशापर्यंत संबंधित पोलीस ठाण्यांत कामकाज पाहावे, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.



**कारवाईपूर्वीच पोलीस घटनास्थळी?**

शेख यांच्या तक्रारीनुसार, १० जुलै २०२६ रोजी करण्यात आलेल्या कथित एनडीपीएस कारवाईच्या अधिकृत कागदपत्रांतील वेळा, स्टेशन डायरीतील नोंदी आणि उपलब्ध फुटेजमधील प्रत्यक्ष घटनाक्रम यांत गंभीर विसंगती आहे. कागदोपत्री कारवाई सुरू झाल्याचे दाखविण्यापूर्वीच काही संबंधित पोलीस कर्मचारी घटनास्थळी उपस्थित असल्याचे फुटेजमध्ये दिसत असल्याचा दावा करण्यात आला आहे.

■ पान ४ वर

अहमदनगर मर्चंटस बँकेची ५४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत

## सभासदांना ५१०० रूपयांच्या ठेव पावतीची भेट देणार – संजय चोपडा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अहमदनगर मर्चंट्स को ऑप बँकेची ५४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा केशर गुलाब मंगल कार्यालयात खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. चेअरमन संजय चोपडा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेत विषयपत्रिकेवरील सर्व विषयांना चर्चेअंती सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. बँकेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त सन २०१४ पूर्वीच्या सभासदांना ५१०० रूपयांची ठेव पावती भेट देण्याची घोषणा यावेळी करण्यात आली. संस्थापक चेअरमन हस्तीमलजी मुनोत व मान्यवरांच्या हस्ते ठेव पावती वाटपाचा शुभारंभ लवकरच करण्यात येणार आहे.

चेअरमन संजय चोपडा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेस बँकेचे संस्थापक चेअरमन तथा विद्यमान संचालक हस्तीमलजी मुनोत, व्हाईस चेअरमन अमित मुथा, संचालक आनंदराम मुनोत, सी.ए.मोहन बरमेचा,किशोर गांधी,संजय बोरा, सी.ए.आयपी अजय मुथा, संजीव गांधी,कमलेश भंडारी, किशोर मुनोत, मिनाताई मुनोत, प्रमिलाताई बोरा, विजय कोथिंबीरे, सुभाष भांड, कर्मचारी प्रतिनिधी जितेंद्र बोरा, प्रसाद गांधी, बोर्ड ऑफ मॅनेजमेंट सदस्य राजेश झंवर, सी.ए.प्रविण कटारिया, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी नितीन भंडारी आदींसह सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सभेत संस्थापक चेअरमन हस्तीमलजी मुनोत यांना नवी दिल्ली स्थित जैन कॉन्फरन्सचा जैन कॉन्फरन्स राष्ट्रीय सन्मान मिळाल्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला.




तसेच उद्योगपती सौरभ बोरा यांना समाज रत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल, उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांच्या हमसफर शॉर्ट फिल्मला राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याबद्दल, बँकेचे संचालक सीए आयपी अजय मुथा यांची आयसीएआय, नवी दिल्लीच्या डायरेक्ट टॅक्स समितीच्या सदस्यपदी निवड झाल्याबद्दल, तसेच दिशान गांधी याने कॉर्फबॉल खेळाच्या मे महिन्यात झालेल्या विश्वचषक स्पर्धेत भारताकडून नेत्रदीपक कामगिरी केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

प्रारंभी प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी नितीन भंडारी यांनी अहवाल वाचन केले व विषयपत्रिकेवरील विषयांची माहिती दिली. चेअरमन संजय चोपडा म्हणाले, बँकेचा कारभार संस्थापक चेअरमन व विद्यमान संचालक हस्तीमलजी मुनीत यांच्याशी तत्वानुसार व मार्गदर्शनानुसार सुरू आहे.

बँकेचे दिनांक ३१ मार्च २०२६ अखेर वसूल भागभांडवल १९ कोटी २२ लाखांचे असून राखीव व इतर निधी २७१ कोटी ८० लाखांचे आहे. मागील आर्थिक वर्षात बँकेचा सीआरएआर १७.९४ टक्के आहे. एसएलआरमध्ये गुंतवणूक ३९१ कोटी २६ लाखांची आहे तसेच नॉन एसएलआर गुंतवणूक व मुदत ठेवी २४० कोटी ९९ लाखांच्या आहेत. बँक भक्कम अशा आर्थिक पायावर उभी आहे. बँकेच्या सातत्यपूर्ण प्रगतीमध्ये सर्व कर्मचाऱ्यांचाही सिंहाचा वाटा आहे. यानिमित्त प्रती कर्मचारी १० हजार रुपये प्रोत्साहनपर बक्षिस देण्यात आले आहे.

अहवाल वर्षात कर्जावरील व्याजातून मिळालेल्या उत्पन्नाच्या तुलनेत २२.०६ टक्के प्रमाणात रिबेट देण्यात आलेला आहे. बँकेने रुपये ७४४.२६ लाखांचा निव्वळ नफा मिळवला आहे.

■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### नर्मदा परिक्रमेला आत्म्याला मुक्तीची साधना मानली जाते - स्वामी राजेंद्र मुनी



अहिल्यानगर- शास्त्रानुसार गंगा स्नानेन मुच्यते,नर्मदा दर्शनात म्हणजेच गंगेत स्नान केल्याने जी पाप नष्ट होतात,ती पाप केवळ नर्मदा मातेच्या दर्शनानेच नष्ट होतात.नर्मदा नदीचा उगम भगवान शंकराच्या तपश्चर्येतून व घामाच्या थेंबातून झाला आहे म्हणून तिला शिवाची कन्या व जिवित देवी मानले जाते. असे प्रतिपादन संत स्वामी राजेंद्र मुनी यांनी केले.अहिल्यानगर येथील गायत्री मंदिरात नर्मदा परिक्रमाचे संमेलन संपन्न झाले. दरवर्षा प्रमाणे पायी नर्मदा परिक्रमा करणाऱ्या परिक्रमा इच्छुक साधकांसाठी माहिती, उद्बोधन परिसंवाद आयोजित करण्यात आला होता.यावेळी नर्मदा परिक्रमाचे नियम,मार्ग,कधी करावी याबाबत सविस्तर माहिती दक्षिण तट नर्मदाखंड हरदा जवळील हंडिया नजीक ग्राम भमोरी येथील संत स्वामी राजेंद्रमुनी यांनी देऊन सुंदर मार्गदर्शन केले. प्रथम नर्मदा परिक्रमा का करावी, महत्व याबद्दल माहिती दिली. त्यानंतर परिक्रमा काळात आश्रमात परिक्रमा करणाऱ्या साधकांनी कसे वर्तन ठेवावे हे दाखले देत स्पष्ट केले. परिक्रमा आणि पंढरपूर वारी याचा फरक स्पष्ट केला. वारी ही पांडुरंग (विठ्ठल) भक्ती साठी पुन्हा पुन्हा करावी हे सांगितले. तसेच नर्मदा परिक्रमा ही शिवपुत्री नर्मदमातेची आत्मसाधना, आत्म संयम, विजनवास (एकट्याने) भक्ती साधना आहे. त्यात संसारी, प्रापंचिक साधकांनी कसा अभ्यास करत त्याग करत सेवासाधना करत परिक्रमेचे फलित सांगितले. उपस्थितांच्या प्रश्नाला उत्तर देताना संकल्प काय करावा. नित्यउपासना महत्व सांगितले. यावेळी साधकांनी शंका उपस्थित केली. त्या सर्वांना समाधान कारक उत्तर राजेंद्र मुनी यांनी दिले शेवटी श्री नर्मदा माईची आरती,अष्टक व कढाई प्रसाद वाटप करण्यात आले.

### अहमदनगर शहर सहकारी बँकेच्या वतीने श्री विशाल गणपतीचे स्वागत; महाआरती संपन्न

अहिल्यानगर - गणेश विसर्जनानिमित्त शहराचे ग्रामदैवत व मानाचा गणपती असलेल्या श्री विशाल गणपती बाप्पाच्या विसर्जन मिरवणुकीचे अहमदनगर शहर सहकारी बँकेच्या वतीने उत्साहात स्वागत करण्यात आले. यावेळी बँकेचे व्हाईस चेअरमन प्रा. माणिक विधाते यांच्या हस्ते श्री विशाल गणपतीची महाआरती करण्यात आली.याप्रसंगी बँकेचे ज्येष्ठ संचालक अशोक कानडे, मुख्य कार्यकारी अधिकारी दिनेश लोखंडे, कर्मचारी प्रतिनिधी संतोष मखरे, वरिष्ठ अधिकारी संजय मुळे, राजेंद्र गायकवाड तसेच नवी पेठ शाखेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. व्हाईस चेअरमन प्रा. माणिकराव विधाते म्हणाले की, गणरायाच्या विसर्जन मिरवणुकीनिमित्त शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणपती बाप्पाचे अहमदनगर शहर सहकारी बँकेच्या वतीने सालाबादप्रमाणे यंदाही मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले. यावेळी विधिवत महाआरती करून श्री गणरायाच्या चरणी नगरकरांच्या सुख-शांतीसाठी प्रार्थना करण्यात आली.शहराचे ग्रामदैवत असलेल्या श्री विशाल गणपतीच्या विसर्जन मिरवणुकीत सहभागी होण्याचा आनंद व्यक्त करत, अहिल्यानगर शहरातील सर्व नागरिकांना सुख, शांती आणि समाधान लाभावे, अशी ईश्वरचरणी प्रार्थना केल्याचे प्रा. माणिक विधाते यांनी सांगितले.

### बांधकाम व्यावसायिक राजू धोत्रे यांना मातृशोक



अहिल्यानगर - तालुक्यातील देहरे येथील कुसूम नामदेव धोत्रे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ६० वर्षे होते. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, सुना, मुली, नातवंडे असा परिवार आहेत. नगर शहरातील बोल्हेगाव येथील बांधकाम व्यावसायिक राजू व विजय धोत्रे यांच्या त्या मातोश्री होत.

# गणेशोत्सवात दिव्यांग बांधवांसाठी मदतीचा हात; ॲडव्होकेट मित्र मंडळाकडून किराणा किट वाटप

**अंधोजन मंडळाच्या १५ ते २० गरजू दिव्यांग बांधवांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** गणेशोत्सवाच्या - मंगलमय पर्वाचे औचित्य साधून अंधोजन मंडळाच्या गरजू अंध व दिव्यांग बांधवांना ॲडव्होकेट मित्र मंडळाच्या वतीने किराणा किटचे वाटप करण्यात आले. या सामाजिक उपक्रमातून सुमारे १५ ते २० गरजू दिव्यांग बांधवांना जीवनावश्यक वस्तूंचे किराणा किट देण्यात आले.

ॲड. सचिन भोजने यांच्या संपर्क कार्यालयात अंधोजन मंडळाचे अध्यक्ष संभाजी भोर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. गणेशोत्सव हा* केवळ धार्मिक उत्सव न राहता समाजातील गरजू घटकांप्रती संवेदनशीलता आणि सामाजिक बांधिलकी जपण्याचे माध्यम ठरावे, या उद्देशाने ॲडव्होकेट मित्र मंडळाने हा उपक्रम आयोजित केला होता. यावेळी ॲड. सचिन भोजने, ॲड. संदीप पाखरे, ॲड. प्रवीण भोर, ॲड. तनवीर शेख, ॲड. प्रियंका खाटेकर, संतोष दरोडे, आदिनाथ भोजने, नाजीम शेख, समीर वखारे, संदीप भोगाडे, फरहान शेख, पराग काळे, संदीप लांडगे आणि ज्ञानेश्वर पाडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच अंधोजन मंडळाचे अध्यक्ष संभाजी भोर, अनिल चाबुकस्वार, गोरख दरंदळे, शाम कोकणे आणि मनेष वैराळ यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

कार्यक्रमाची प्रस्तावना अंधोजन मंडळाचे अध्यक्ष संभाजी भोर यांनी केली. त्यांनी अंध व दिव्यांग बांधवांच्या विविध गरजा आणि त्यांच्या अडचणींवर प्रकाश टाकला. समाजातील गरजू घटकांना केवळ सहानुभूती न देता त्यांच्या दैनंदिन गरजांच्या वेळी प्रत्यक्ष मदतीचा हात देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

गणेशोत्सवाच्या निमित्ताने ॲडव्होकेट मित्र मंडळाने पुढाकार घेऊन गरजू दिव्यांग बांधवांना जीवनावश्यक वस्तू उपलब्ध करून दिल्याबद्दल उपस्थितांनी समाधान व्यक्त केले. अशा उपक्रमांमुळे दिव्यांग बांधवांना आधार मिळण्याबरोबरच समाजात आपलेपणा आणि आत्मविश्वासाची भावना निर्माण होण्यास मदत होते, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

अंधोजन मंडळाच्या वतीने गरजू अंध व दिव्यांग बांधवांसाठी विविध सामाजिक उपक्रम सातत्याने राबविले जात आहेत. शिक्षण, आरोग्य तसेच दैनंदिन जीवनातील आवश्यक बाबींमध्ये मदतीची गरज असलेल्या व्यक्तींना शक्य ते सहकार्य करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर समाजातील सामाजिक कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी, राजकीय नेते, उद्योजक, दानशूर व्यक्ती तसेच आर्थिकदृष्ट्या सक्षम नागरिकांनी अंध व दिव्यांग बांधवांच्या शिक्षण, आरोग्य आणि दैनंदिन गरजांसाठी पुढे यावे, असे आवाहन अंधोजन मंडळाच्या वतीने करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोरख दरंदळे यांनी केले,.

# संघर्ष प्रतिष्ठान ट्रस्टच्या वतीने घेण्यात आलेल्या होम मिनिस्टर स्पर्धेला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**मिठापेल्ली, पतंगे व वर्मा ठरल्या विजेत्या; सोन्याची नथ, चांदीचे नाणे व पैठणीचे बक्षीस**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** श्रमिक नगर, सावेडी येथे संघर्ष प्रतिष्ठान ट्रस्टच्या वतीने आयोजित करण्यात आलेली 'होम मिनिस्टर' स्पर्धा महिलांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात उत्साहात संपन्न झाली. पोखरणा ज्वेलर्स यांच्या प्रायोजकत्वातून आयोजित मार्केटिंग टीम कडून करण्यात आलेल्या या स्पर्धेत परिसरातील असंख्य महिलांनी सहभागी होत विविध खेळ व मनोरंजनात्मक उपक्रमांचा आनंद घेतला.

महिलांच्या कलागुणांना वाव मिळावा, त्यांना दैनंदिन जीवनातील धावपळीतून विरंगुळा मिळावा तसेच त्यांच्यातील आत्मविश्वास वाढावा, या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेदरम्यान महिलांसाठी विविध प्रकारचे खेळ घेण्यात आले. खेळांमध्ये सहभागी होताना महिलांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला.

स्पर्धेत प्रथम क्रमांक सौ. अस्मिता मिठापेल्ली यांनी पटकावला. त्यांना सोन्याची नथ बक्षीस देण्यात आली. द्वितीय क्रमांक सौ अर्चना पतंगे यांनी मिळविला असून त्यांना चांदीचे नाणे, तर तृतीय क्रमांक हेमलता वर्मा यांनी मिळविला असून त्यांना पैठणी देऊन गौरविण्यात आले.

स्पर्धेचे संपूर्ण सूत्रसंचालन शेखर आडेप यांनी केले. आपल्या उत्साही सूत्रसंचालनातून त्यांनी कार्यक्रमात रंगत आणली. विविध खेळांच्या माध्यमातून महिलांचा उत्साह वाढवत त्यांनी संपूर्ण स्पर्धेचे वातावरण आनंदी ठेवले.

संघर्ष प्रतिष्ठान ट्रस्टच्या वतीने आयोजित या उपक्रमाचे महिलांकडून कौतुक करण्यात आले. अशा स्पर्धांमुळे महिलांना आपल्या कलागुणांचे सादरीकरण करण्याची संधी मिळते, तसेच परिसरातील महिलांमध्ये संवाद व आपलेपणाची भावना वाढीस लागते. उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या होम मिनिस्टर स्पर्धेला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी संघर्ष प्रतिष्ठान ट्रस्टच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

**देवी पार्वतीनेच सुरू केला मृत्तिकेच्या गणपतीचा पूजाविधी**

# गणेश आराधना विघ्ने घालवून आनंद मिळवून देणारी

**प्रवचनकार मिलिंद महाराज चवंडके यांचे प्रतिपादन**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** हिमाचलाची कन्या देवी पार्वतीने भाद्रपद शुद्ध चतुर्थीला गजाननाची मृत्तिकेची मूर्ती तयार करून तिचे यथाविधी पूजन केले. पूजेने मूर्ती सजीव झाली. तेव्हापासून गणेशाचा जन्म झालेल्या भाद्रपद शुद्ध चतुर्थी या तिथीस गणेशाचे पूजन भक्तिभावाने करण्यास सुरुवात झाली, असे प्रतिपादन प्रवचनकार मिलिंद महाराज चवंडके यांनी केले.

विश्व हिंदू परिषदेच्या दुर्गावाहिनी जिल्हा शाखेतर्फे जिल्हा संयोजिका श्रीमती जयश्रीताई पोटे यांच्या निवासस्थानी आयोजित केलेल्या प्रवचन सोहळ्यात ते बोलत होते. श्रीमती जयश्रीताई पोटे यांनी स्वागत केले. विहिंपचे विभाग मंत्री सुनीलराव खिस्ती आणि अशोक शहापुरे यांच्या हस्ते मिलिंद महाराज चवंडके यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी विहिंप मातृशक्ती जिल्हा संयोजिका सौ.हिराताई शहापुरे, मयुरी जोशी,आरती वाघ, श्रेया कदम, ज्येष्ठ पत्रकार सुधीर कुलट, तेजस पोटे, संजय सपकाळ, जनार्दन तांबे, मिलिंद फुंदे, बलराम वाघ, प्रसाद कदम, निखिल शेंडे यांच्यासह द्वारकाधीश कॉलनीतील भाविक उपस्थित होते.





मिलिंद महाराज चवंडके पुढे म्हणाले,देवाधिदेव महादेवांनी गणपती मंत्राचे सामर्थ्य भृगूऋषींना सांगताना गणपतीचा सहा अक्षरी आणि एकाक्षरी मंत्र श्रेष्ठ आहे. गणपती मंत्राचे अनुष्ठान विघ्न घालवून इष्ट फल देणारे आहे, असे सांगितले. गणेश सहस्त्रनामाचा जप इच्छापूर्तीचा आनंद मिळवून देतो. भगवान शंकराने गणेश सहस्त्रनामाचा पाठ आणि एकाक्षर मंत्राचा जप करत त्रिपुरासुराचा वध कार्तिक शुद्ध पौर्णिमेला सायंकाळी केला. ती स्मृती म्हणून दीपोत्सव साजरा केला जातो. हिमालयाने पार्वतीला भगवान शंकराच्या प्राप्तीसाठी वरद गणेशाचे व्रत करायला सांगितले होते.

संकष्टी चतुर्थीचे माहात्म्य, अंगारकी चतुर्थीचे माहात्म्य, निवडलेल्या २१ दुर्वांचे माहात्म्य, सर्व विघ्ने घालवणारी गणपतीची सुमुख, एकदंत, कपिल, गजकर्ण, लंबोदर, विकट, विघ्ननाशक, गणाधिप, धूम्रकेतू, गणाध्यक्ष, भालचंद्र व गजानन ही १२ नावे, ढुंढिराजनामाचे माहात्म्य, देवी पार्वतीच्या श्वासोच्छ्वासाबरोबर नेत्रातील अलौकिक तेजामधून प्रगटलेला वक्रतुंड, उंदराचे रूप घेऊन आलेल्या क्षम आणि कुशल या दैत्यांना बाल गणेशाने पाळण्यात असताना गतप्राण केले, क्रौंच गंधर्व शापामुळे उंदीर होऊन गणपतीचे वाहन झाला, या गणेश पुराणातील कथा सांगून मिलिंद महाराज चवंडके यांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

अहिल्यानगरचे ग्रामदैवत विशाल गणपती नाथपंथी असून तीन हातांनी भाविकांना आशीर्वाद देणारा आहे. पारनेरच्या गणेशखिंडीतील गणपती अंगारकी चतुर्थीचे महत्त्व सांगतो. आव्हाने गावात निद्रिस्त गणपती भाविकांचे श्रद्धास्थान आहे. नवनाथांमधील श्रीकानिफनाथ गणेश मंत्रांचा जप करतच प्रगट झाले, असे वास्तव श्रोत्यांच्या पुढ्यात ठेवत मिलिंद महाराज चवंडके यांनी गणपतीचे माहात्म्य निवेदन केले. गणपतीची महाआरती करून प्रसाद वाटपाने सांगता करण्यात आली.

# नय्यर विद्यालयात डेंगूमुक्त अभियान; विद्यार्थ्यांकडून पथनाट्याद्वारे जनजागृती



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने नय्यर प्राथमिक माध्यमिक विद्यालय येथे 'डेंगूमुक्त अहिल्यानगर' अभियान राबविण्यात आले. या अभियानांतर्गत विद्यार्थ्यांनी पथनाट्याच्या माध्यमातून डेंगू आजाराबाबत नागरिकांमध्ये जनजागृती केली. तसेच विद्यार्थ्यांनी आपल्या परिसरातील दहा घरांमधील पाणीसाठ्यांची तपासणी करून नागरिकांना डेंगू प्रतिबंधाबाबत माहिती द्यावी, असे आवाहन उपायुक्त निखिल फराटे यांनी केले.

यावेळी नागरिकांच्या घरोघरी जाऊन पाणीसाठ्यांची तपासणी करण्यात आली. उपायुक्त निखिल फराटे, नगरसेविका संध्याताई पवार, रोशनी त्रिंबके, नगरसेवक निखिल वारे, महेश तवले, माजी नगरसेवक बाळासाहेब पवार, डॉ. भास्कर रणवरे, डॉ. गणेश माने, मुख्याध्यापक श्रीकृष्ण पवार, एकनाथ मोरे, डॉ. सृष्टी बनसोडे, डॉ. आयेशा शेख, एकनाथ खिलारी, डॉ. वृषाली आरु, डॉ. आदिती पाटोळे यांच्यासह पालक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपायुक्त निखिल फराटे म्हणाले की, विद्यार्थी हे उद्याच्या भारताचे उज्ज्वल भविष्य आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी सामाजिक कामाची आवड जोपासत 'डेंगूमुक्त अहिल्यानगर' अभियानामध्ये सक्रिय सहभाग घ्यावा. प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या परिसरातील किमान दहा घरांतील पाणीसाठ्यांची तपासणी करून नागरिकांमध्ये डेंगू प्रतिबंधाबाबत जनजागृती करावी. आठवड्यातून एक दिवस 'कोरडा दिवस' म्हणून सामूहिकरीत्या पाळावा. स्वच्छ पाण्यातील अळ्यांपासून डेंगूच्या डासांची उत्पत्ती होऊन नागरिकांना डेंगूची लागण होण्याचा धोका निर्माण होतो. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. डेंगूचा प्रसार रोखण्यासाठी नागरिकांनी आपल्या घरातील तसेच परिसरातील पाणीसाठ्यांकडे विशेष लक्ष द्यावे, असे फराटे यांनी सांगितले.

डेंगूमुक्त अहिल्यानगर अभियानामध्ये सर्व नगरकरांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन प्रशासनाच्या प्रयत्नांना सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

माजी नगरसेवक बाळासाहेब पवार म्हणाले की, दैनंदिन जीवनामध्ये वावरताना आपण अनेक महत्त्वाच्या बाबींकडे जाणून-बुजून दुर्लक्ष करतो. पाणी बचत, स्वच्छता आणि पर्यावरण संरक्षण या विषयांकडे दुर्लक्ष झाल्यास त्याचा विपरीत परिणाम मानवी जीवनावर होताना दिसतो.

पर्यावरणाची हानी आणि निसर्गावर होणारे आघात यामुळे भविष्यात अनेक गंभीर समस्या निर्माण होऊ शकतात. त्यामुळे निसर्गाचे संवर्धन करण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांनी पुढाकार घेऊन वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनाची लोकचळवळ उभी करावी, असे आवाहन त्यांनी केले. पावसाळ्यात साथीचे आजार मोठ्या प्रमाणात पसरत असल्याने नागरिकांच्या आरोग्याच्या समस्या निर्माण होतात. हे रोखण्यासाठी संघटित प्रयत्नांची आवश्यकता आहे. डेंगू हा स्वच्छ पाण्यात निर्माण होणारा गंभीर

# सावेडी उपनगराच्या गणेश विसर्जन मिरवणुकीतून 'माझी हरवलेली मराठी शाळा'चा जागर!

**शालेय गणवेशातील ढोलवादक विद्यार्थ्यांनी दिला मराठी शाळा व मातृभाषा जपण्याचा संदेश । महाराष्ट्र गीत, प्रतिज्ञा अन् शाळेची घंटा ठरले आकर्षण**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** गणेश विसर्जन मिरवणुकीत उत्साह, भक्ती आणि जल्लोषासोबतच सामाजिक व शैक्षणिक जनजागृतीचा संदेश देत सावेडी उपनगरात 'माझी हरवलेली मराठी शाळा' हा आगळावेगळा उपक्रम साकारण्यात आला. मोरया युवा प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या मिरवणुकीत शालेय गणवेश परिधान केलेल्या ढोलवादक विद्यार्थ्यांनी ढोल-ताशांच्या गजरातून मराठी शाळा आणि मातृभाषा संवर्धनाचा संदेश दिला.

माजी आमदार संग्राम भैय्या जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली व मंडळाचे अध्यक्ष अर्जुन मदान यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. मिरवणुकीच्या प्रारंभी महाराष्ट्र गीत सादर करण्यात आले. त्यानंतर उपस्थित भाविक तसेच ढोल पथकातील विद्यार्थ्यांनी मराठी शाळा आणि मातृभाषेला प्रोत्साहन देण्याची प्रतिज्ञा घेतली. त्यानंतर शाळेची घंटा वाजवून मिरवणुकीला औपचारिक सुरुवात करण्यात आली. गणंत प्रतिष्ठान ढोल-ताशा पथकाने केलेल्या दमदार वादनाने परिसर दणाणून गेला.

या मिरवणुकीतील सर्वाधिक लक्षवेधी बाब म्हणजे शालेय गणवेशातील ढोलवादक विद्यार्थी. गणवेश, दप्तर, पुस्तके आणि शाळेची घंटा अशा प्रतीकांमधून एकेकाळच्या मराठी शाळेचे भावविश्व साकारण्यात आले. विद्यार्थ्यांनी केलेल्या वादनाने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. गणेशोत्सवाच्या उत्साहातही मराठी शाळा आणि मातृभाषेच्या संवर्धनाचा गंभीर प्रश्न प्रभावीपणे मांडण्यात आला. आजच्या स्पर्धात्मक युगात इंग्रजी भाषेचे ज्ञान आणि आधुनिक शिक्षणाचे महत्त्व निश्चितच आहे. मात्र, इंग्रजीच्या प्रवाहात मराठी माध्यमाच्या शाळांशी आणि मातृभाषेशी असलेले नाते तुटू नये, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. 'इंग्रजी शिका, जगाशी जोडा; पण मराठी जपा, आपल्या मातीशी नाते जोडा!' या विचारातून नागरिकांना मातृभाषेचे महत्त्व पटवून देण्यात आले.

त्यामुळे 'माझी शाळा हरवली... माझी भाषा हरवू नये!' हा संदेश मिरवणुकीच्या माध्यमातून नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आला. गणेश



विसर्जनाच्या आनंदोत्सवाला सामाजिक आणि शैक्षणिक आशयाची जोड देणारा हा उपक्रम उपस्थितांच्या चर्चेचा विषय ठरला. या उपक्रमातून मराठी शाळांचे महत्त्व, मातृभाषेचे संस्कार आणि आपल्या मातीशी असलेले नाते जपण्याचा संदेश देण्यात आला. शालेय गणवेशातील विद्यार्थ्यांचे ढोलवादन, महाराष्ट्र गीत, सामूहिक प्रतिज्ञा आणि शाळेच्या घंटेने झालेली सुरुवात यामुळे 'माझी हरवलेली मराठी शाळा' हा उपक्रम मिरवणुकीतील विशेष आकर्षण ठरला.मराठी शाळा ही केवळ आठवण नाही, तर संस्कारांची शिदोरी

आजच्या काळात मुलांनी इंग्रजीसह आधुनिक शिक्षण आत्मसात करणे गरजेचे आहे. मात्र, त्यासाठी मातृभाषा आणि मराठी शाळांकडे दुर्लक्ष होता कामा नये. मराठी शाळांनी अनेक पिढ्यांना शिक्षणासोबत संस्कार, शिस्त, सामाजिक जाणीव आणि आपल्या संस्कृतीची ओळख दिली आहे.'माझी हरवलेली मराठी शाळा' या संकल्पनेतून नवीन पिढीला आपल्या शाळेची आणि मातृभाषेची आठवण करून देण्याचा प्रयत्न करण्यात आला. शालेय गणवेशातील विद्यार्थ्यांनी ढोलवादन करत दिलेला संदेश हा केवळ मिरवणुकीपुरता मर्यादित नसून मराठी भाषा आणि मराठी शाळांच्या संवर्धनासाठी समाजाने विचार करण्याची गरज अधोरेखित करणारा आहे.
-अर्जुन मदान (अध्यक्ष, मोरया युवा प्रतिष्ठान)

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### गणेश विसर्जन मिरवणुकीत आढळला विषारी मण्यार; सर्पमित्राने दिले जीवदान



अहिल्यानगर - गणेश विसर्जन मिरवणुकीत मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले असताना शहापूर परिसरात अत्यंत विषारी मण्यार जातीचा साप आढळून आल्याने काही काळ नागरिकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली. सर्पमित्र कृष्णा पाटील बेरड यांनी घटनास्थळी पोहोचून सापाला सुरक्षितपणे पकडले आणि त्यानंतर त्याची निसर्गात मुक्तता केली.गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान सर्प आढळल्यानंतर कृष्णा पाटील बेरड यांनी नागरिकांना सापांबाबत महत्त्वपूर्ण माहिती दिली. साप हा पर्यावरणातील महत्त्वाचा घटक असून निसर्गाचा समतोल राखण्यात त्याची भूमिका महत्त्वाची असल्याचे त्यांनी सांगितले.''साप दिसला म्हणून घाबरून जाऊ नका किंवा त्याला मारू नका. सापाला सुरक्षित अंतरावरून पाहावे आणि तत्काळ सर्पमित्र अथवा संबंधित वन्यजीव बचाव पथकाशी संपर्क साधावा,'' असे आवाहन कृष्णा पाटील बेरड यांनी केले.मण्यारसारखे विषारी साप मानवी वस्तीत आढळल्यास नागरिकांनी स्वतः हून साप पकडण्याचा प्रयत्न करू नये. गर्दी न करता परिसर सुरक्षित ठेवावा आणि प्रशिक्षित सर्पमित्रांना पाचारण करावे, असेही त्यांनी सांगितले.सापांबाबत असलेले गैरसमज दूर करून सर्पसंवर्धन आणि वन्यजीव संरक्षणाबाबत जनजागृती करणे गरजेचे आहे. साप हा शत्रू नसून पर्यावरणीय साखळीतील महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे त्याचे संरक्षण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे सर्पमित्र कृष्णा पाटील बेरड यांनी स्पष्ट केले.

### आज सोमवारी ''एक अजनबी हसीना से'' गीतांची मैफिलीचे आयोजन




अहिल्यानगर- जुन्या व नव्या हिंदी चित्रपट गीतांची सुरेल मेजवानी देणाऱ्या 'गाता रहे मेरा दिल' प्रस्तुत ''एक अजनबी हसीना से'' दुसऱ्या भागाच्या गीतांची मैफिलीचे आयोजन सोमवार दि.२८ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजता रोज गोल्ड हॉल आकाशवाणी केंद्रा समोर शिंगवी ज्वेलर्सच्या बेसमेंट प्रोफेसर चौक येथे करण्यात आले आहे. 'एक अजनबी हसीना से...' या संकल्पनेअंतर्गत 'नगमों नये पुराने' या कार्यक्रमाचा भाग-२ सादर करण्यात आले असल्याचे आयोजक अमीन धारणी यांनी सांगितले. या मैफिलीत डॉ सुरेखा घोडके, जयश्री डावरे, सुनील भंडारी, संजय भिंगारदिवे, धनंजय आरडे, जयंत पाठक,राजू भारस्कर,संदीप सोनसळे, प्रदीप शिरसाठ, मंगेश भुते, मुकुंद ढोले, माधवी गुजर, निलेश गाडेकर, संतोष सूर्यवंशी, वृषाल एकबोटे, चारुदत्त ससाने, सागर अडागडे, मयुरी ढोले, राजेश आरे, मार्टिन गोरडे हे गायक विविध लोकप्रिय गीते सादर करणार आहेत.असल्याचे ॲड.गुलशन धाराणी यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आबिद खान करणार आहेत.संगीतप्रेमींसाठी आयोजित करण्यात आलेला हा कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य असून कार्यक्रम वेळेवर सुरू होणार आहे. जुन्या-नव्या हिंदी गीतांचा सुरेल आनंद घेण्यासाठी अहिल्यानगर शहर व परिसरातील सर्व संगीतप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक अमीन धारणी यांनी केले आहे.

---

ढाकणे पॉलिटेक्निक कर्मचारी पतसंस्थेच्या

# तज्ञ संचालकपदी एकनाथ ढाकणे व सौ. हर्षा ढाकणे यांची बिनविरोध निवड

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**राक्षी–** केदारेश्वर ग्रामीण विकास प्रतिष्ठान, संगमनेर संचलित कै. सौ. सुनीताताई एकनाथराव ढाकणे पॉलिटेक्निक कॉलेज सेवकांची सहकारी पतसंस्था मर्यादित, राक्षी, ता. शेवगाव, जि. अहिल्यानगर या संस्थेच्या तज्ञ संचालकपदी संस्थेचे संस्थापक माननीय एकनाथराव ढाकणे यांची, तर महिला तज्ञ संचालकपदी सौ. हर्षा ऋषिकेश ढाकणे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

पतसंस्थेची १४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २६ सप्टेंबर २०२६ रोजी ढाकणे शैक्षणिक संकुल, राक्षी, ता. शेवगाव येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. सभेच्या अध्यक्षस्थानी पतसंस्थेचे चेअरमन श्री. श्रीकांत एकनाथराव ढाकणे होते. यावेळी सहकार अधिकारी श्री. तोत्रे साहेब मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. संस्थेच्या कामकाजाला अधिक व्यापक दिशा देण्यासाठी तसेच सहकार व शैक्षणिक क्षेत्रातील अनुभवाचा उपयोग पतसंस्थेच्या विकासासाठी व्हावा, या उद्देशाने तज्ञ संचालकांच्या निवडीचा प्रस्ताव सभेसमोर ठेवण्यात आला. यावेळी श्री. सुनील अवताडे यांनी माननीय एकनाथराव ढाकणे यांच्या नावाची सूचना मांडली. त्यास श्री. बारकू ननवरे व प्रा. महेश मरकड यांनी अनुमोदन दिले.

तसेच महिला तज्ञ संचालक म्हणून सौ. हर्षा ऋषिकेश ढाकणे यांच्या नावाची सूचना मांडण्यात आली. त्यासही उपस्थित सभासदांनी अनुमोदन देत एकमताने पाठिंबा दर्शविला. दोन्ही पदांसाठी अन्य कोणतेही नामनिर्देशन न झाल्याने सभेच्या अध्यक्षस्थानी असलेले चेअरमन श्री. श्रीकांत ढाकणे यांनी टाळ्यांच्या कडकडाटात दोन्ही मान्यवरांची तज्ञ संचालक व महिला तज्ञ संचालक म्हणून बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केले. माननीय एकनाथराव ढाकणे यांना सहकार क्षेत्राबरोबरच शैक्षणिक क्षेत्राचा प्रदीर्घ अनुभव असून, संस्थेच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याच्या उभारणीत त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. त्यांच्या अनुभवाचा व मार्गदर्शनाचा पतसंस्थेच्या भविष्यातील वाटचालीस निश्चितच लाभ होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. तसेच सौ. हर्षा ऋषिकेश ढाकणे यांची महिला तज्ञ संचालक म्हणून झालेली निवड ही महिलांचा संस्थात्मक निर्णयप्रक्रियेत सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

निवडीनंतर उपस्थित संचालक मंडळ, सभासद व मान्यवरांनी माननीय एकनाथराव ढाकणे व सौ. हर्षा ऋषिकेश ढाकणे यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी पतसंस्थेचे सर्व संचालक मंडळ, सभासद तसेच कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सभेचे वातावरण उत्साहपूर्ण व खेळीमेळीचे होते.

---

# शेवगाव शहरात गणरायाला भक्तिभावाने निरोप; शिवसेना नेते अरुण मुंढे यांचा विसर्जन मिरवणुकीत सहभाग

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**शेवगाव–** गणेशोत्सवाच्या सांगतेनिमित्त शेवगाव शहरात विविध गणेश मंडळांच्या वतीने गणेश विसर्जन मिरवणूक भक्तिभाव, उत्साह आणि शिस्तीच्या वातावरणात पार पडली. या मिरवणुकीत शिवसेना नेते अरुण मुंढे यांनी उपस्थित राहून विविध गणेश मंडळांना भेटी देत श्री गणरायाचे मनोभावे दर्शन घेतले.

छत्रपती शिवाजी चौक येथील बाजारपेठेतील मानाच्या गणपती मंडळाला अरुण मुंढे यांनी भेट दिली. यावेळी मंडळाच्या अध्यक्षांचा सत्कार करून गणेशोत्सवाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले. शहरातील विविध मंडळांच्या विसर्जन मिरवणुकीत सहभागी होत त्यांनी गणरायाचे दर्शन घेतले तसेच मंडळांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांशी संवाद साधला.

विसर्जन मिरवणुकीत विविध गणेश मंडळांच्या ढोलपथकांनी सादर केलेल्या पारंपरिक वादन व नृत्याने वातावरणात उत्साहाची रंगत वाढली. नागरिकांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून गणरायाला भक्तिभावाने निरोप दिला. संपूर्ण मिरवणुकीत शांतता, शिस्त आणि सामाजिक सलोखा जपण्यावर भर देण्यात आला.

गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता सामाजिक एकोपा, सांस्कृतिक परंपरा आणि नागरिकांच्या सहभागातून शहरातील सलोखा अधिक दृढ करणारा उत्सव असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. शांतता व शिस्तीने उत्सव साजरा करून प्रशासनाला सहकार्य करणाऱ्या सर्व गणेश मंडळांचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिकांचे अरुण मुंढे यांनी अभिनंदन केले.

यावेळी शेवगाव पोलीस स्टेशनचे पीआय श्री. बोरसे, अशोक शेठ अहुजा, प्रेमभाऊ जाजू, राजभाऊ तरटे, भूषण देशमुख, नगरसेवक नंदकुमार मुंढे, मा. नगरसेवक अजय भारस्कर, शब्बीरभाई शेख, दिगंबर तात्या काथवटे, एकनाथ कुसळकर, किरण भोकरे, अंकुश ढाकणे यांच्यासह मान्यवर, गणेश मंडळांचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच शहरातील नागरिक व महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

---

# मातांनी मुलांबरोबर मैत्रीचे नाते ठेवा – प्राचार्य खिलारी

## श्री ढोकेश्वर विद्यालयात माता पालक मेळावा संपन्न



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**टाकळी ढोकेश्वर–** अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे, श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्य. विद्यालय, टाकळी ढोकेश्वर या विद्यालयात, शनिवारी माता पालक मेळावा विद्यालयाचे प्राचार्य श्री. बाळासाहेब खिलारी यांच्या अध्यक्षतेखाली अतिशय उत्साहात पार पडला. यावेळी प्राचार्यांनी आपल्या भाषणातून माता-भगिनींना सांगितले की, आजच्या स्पर्धेच्या युगात मुलांच्या पाठीवर कौतुकाची थाप देणे, गरजेचे आहे. माता पालकांनी आपल्या मुलांबरोबर केवळ पालक म्हणून नव्हे, तर मैत्रीचे नाते निर्माण करावे. जेणेकरून मुले आपल्या मनातील गोष्ट मोकळेपणाने सांगतील. विद्यार्थी पालक व शिक्षक यांच्यात सातत्यपूर्ण संवाद होणे गरजेचे आहे. पालकांनी आपल्या पाल्यांना मोबाईल जंक फूड पासून दूर ठेवावे. मुला-मुलींना पौष्टिक व सकस आहार द्यावा. असेही यावेळी सांगितले.

विद्यालयाचे पर्यवेक्षक श्री. बाळासाहेब निवडुंगे, समन्वयक श्री. अशोक गांगड व श्रीम. सुरेखा ठाणगे यांनीही आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, शैक्षणिक प्रगती, दैनंदिन उपस्थिती, मुलींची सुरक्षा व आरोग्य या विषयी माता भगिनींना मार्गदर्शन केले. महिला पालकांमधून सौ. दिपाली झावरे मॅडम, सौ. सुवर्णा कडुसकर, सौ. शेलार मॅडम, श्रीम. घोलप मॅडम यांनी आपल्या भाषणातून विद्यालयातील कामकाजाचे कौतुक केले. व मातांनी आपल्या पाल्यांची काळजी कशी घ्यावी. याविषयी विचार मांडले.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व दीपप्रज्वलन करून झाली. श्रीम. कल्पना जाधव यांनी प्रास्ताविक व अध्यक्ष निवड केली. अनुमोदन श्रीम. सुमन वाळुंज यांनी दिले. सूत्रसंचालन श्रीम. सोनल रोहोकले यांनी केले. तर आभार प्रदर्शन श्रीम. वैशाली गायखे यांनी केले. विद्यालयाच्या वतीने सर्व महिला पालकांचा गुलाब पुष्प देऊन सत्कार केला. या कार्यक्रमासाठी विद्यालयातील सर्व महिला शिक्षिका व महिला पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

रानकवी प्रतिष्ठान, ज्ञानाई फाउंडेशन संस्थेच्या

# ज्येष्ठ गीतकार जगदीश खेबुडकर साहित्य गौरव पुरस्काराने कथालेखक बाळासाहेब देशमुख

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** रान कवी प्रतिष्ठान व ज्ञानाई फाउंडेशन विचार मंच पुणे आयोजित वे१०० राज्यस्तरीय पुणे मराठी काव्य संमेलन, महात्मा फुले सांस्कृतिक भवन वानवडी पुणे येथे रविवार, २७ सप्टेंबर रोजी, प्रा डॉ श्रीपाल सबनीस (८९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाध्यक्ष) यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. दिवसभर झालेल्या कार्यक्रमात कवी संमेलन ,गझल मुशायरे, विविध क्षेत्रातील नैपुण्य मिळविलेल्या मान्यवरांना पुरस्कार, असे कार्यक्रम संपन्न झाले. सदर संमेलन मध्ये कथालेखक बाळासाहेब देशमुख यांना ज्येष्ठ गीतकार जगदीश खेबुडकर साहित्य गौरव पुरस्काराने , प्रा डॉ. श्रीपाल सबनीस, ज्येष्ठ कवी सुभाष सोनवणे, निसर्ग कवी लक्ष्मण शिंदे, ज्येष्ठ गझलकार रज्जाक शेख, लोककवी सीताराम नरके, रानकवी जगदीप वनशिव या मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी जेष्ठ लेखक देवा झिंजाड , आनंदा साळवे, ज्येष्ठ गजलकार बाळासाहेब गिरी, साईनाथ रहाटकर , इत्यादी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालक सुप्रसिद्ध निवेदक संदीप रासकर यांनी केले. बाळासाहेब देशमुख यांचे आजवर रंग माझा वेगळा, माणसे अशी अन् तशीही.., माणसे भिंगातून.. हे कथासंग्रह प्रसिद्ध झालेले आहेत. त्यांचा लवकरच मोसाइक हा कथासंग्रह प्रसिद्धीच्या वाटेवर आहे. सदर सम्मेलनमध्ये राज्याच्या विविध भागातून साहित्यिक उपस्थित होते. आयोजक लोककवी सिताराम नरके यांनी प्रास्ताविक केले. तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन रानकवी जगदीप वनशिव यांनी केले. बाळासाहेब देशमुख यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल, ज्येष्ठ साहित्यिक चंद्रकांत पालवे, बाबुराव उपाध्ये , सदानंद भणगे, इतिहास अभ्यासक नवनाथ वाव्हळ, ज्येष्ठ कवी शशिकांत शिंदे, अभ्यासक्रमातील कवी दादासाहेब कोते यांनी अभिनंदन केले आहे.

---

# कै उषाताई शिर्शीकर यांचे स्मरणार्थ स्व. माधवराव दगडूजी मुळे प्रतिष्ठान ला ५१००० ची देणगी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** कै.उषाताई प्रभाकर शिर्शीकर यांच्या समरणार्थ स्व. माधवराव दगडुजी मुळे प्रतिष्ठान, अहिल्यानगर या प्रतिष्ठानसाठी श्री छत्रपती शिवाजी विद्यालय, देवळाली प्रवराचे प्राचार्य श्री. मकरंद दिगंबर रायते यांचे मार्फत ५१००० रुपयांचा चा धनादेश प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री मुकेश माधवराव मुळे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला .

स्व. माधवराव मुळे प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षी विद्यार्थी गुणवत्ता वाढीच्या दृष्टीने राज्यस्तरावर विविध स्पर्धांचे आयोजन करून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव दिला जातो. दहावी व बारावी मध्ये शिक्षण घेत असणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर शिबिरांचे आयोजन, आरोग्यविषयक शिबिरांचे आयोजन, गरजू व गरीब विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप अशा अनेक योजना प्रतिष्ठानच्या माध्यमातून गेल्या पाच वर्षापासून राबविल्या गेल्या असून . या सर्व कार्याची दखल घेऊनच प्रतिष्ठानला देणगी दिली असल्याचे प्राचार्य रायते यांनी यावेळी सांगितले.

स्वर्गीय उषाताई शिर्शीकर यांच्या स्मरणार्थ त्यांच्या नावे स्पर्धेत बक्षीस वितरण करणार असल्याचे प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री मुकेश मुळे यांनी सांगितले. प्रतिष्ठानला देणगी दिल्याबद्दल प्रतिष्ठानच्या वतीने प्राचार्य रायते यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

---

# अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलातील ८५ सेवानिवृत्त पोलीस कर्मचाऱ्यांना मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचेकडून काल्पनिक वेतन वाढ मंजूर झाल्याने ॲड.अंबेटकर यांचा सत्कार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलातील सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक वसंत वाव्हळ व इतर ८४ सेवानिवृत्त पोलीस कर्मचाऱ्यांनी महाराष्ट्र शासन अधिसूचना २००९ मधील नियम १० च्या तरतुदीनुसार सेवानिवृत्तीच्या शेवटची वेतनवाढ मिळाल्यानंतर सलग १८० दिवस किंवा त्यापेक्षा जास्त सेवा झाली असल्यास काल्पनिक वेतनवाढ मिळणे संदर्भात मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे रिट याचिका दाखल केली त्यावर मा. न्यायमूर्ती आबासाहेब शिंदे व न्यायमूर्ती नितीन सूर्यवंशी यांचे समोर सुनावणी होऊन मा. न्यायालयाने सेवानिवृत्त कर्मचारी च्या बाजूने निकाल देऊन त्यांची काल्पनिक वेतन वाढ मिळण्याची मागणी मान्य करून ९० दिवसाच्या आत याचिकाकर्ते यांना फरकासह रक्कम अदा करणे बाबत संबंधित विभागास निर्देश दिले. याचिकाकर्ते यांचे तर्फे अडव्होकेट श्री अंबेडटकर यांनी बाजू मांडली त्यानिमित्ताने सेवानिवृत्त कर्मचारी श्री जमाल शेख, श्री वसंत वाव्हळ, श्री रउफ भाई शेख, सुनील सूर्यवंशी प्रकाश लोखंडे, मोहनराव भोसले, अरुण बांगर, कैलास सोनार यांच्यातर्फे अडव्होकेट श्री अंबेटकर उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचा अहिल्यानगर येथे सत्कार करण्यात आला सत्कार प्रसंगी अडव्होकेट अंबेटकर यांनी कर्मचाऱ्यांच्या अडीअडचणी समजावून घेऊन त्यांना वेतना संबंधी व काल्पनिक वेतन वाढ बाबत तसेच हायकोर्टात दाखल करण्यात येणाऱ्या रिट याचिकेबाबत सविस्तर व उपयुक्त माहिती देऊन न्याय मिळवून देणेबाबत आश्वासन दिले.

---

# मनपा कर्मचाऱ्यांच्या कर्ज हप्त्यांची कपात केलेली रक्कम तातडीने द्या

## महानगरपालिकेसमोर पतसंस्थेचे संचालक मंडळ व सभासदांचे धरणे आंदोलन; मनपाकडे ४ कोटी ३१ लाख ९१ हजार ३२० रुपयांची थकबाकी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या माध्यमातून महानगरपालिका कर्मचाऱ्यांना अडचणीच्या काळात, तसेच वैद्यकीय उपचार आणि मुला-मुलींच्या शुभकार्यासाठी तातडीने कर्जरूपी आर्थिक मदत केली जाते. या कर्जाची मासिक हप्त्याची रक्कम संबंधित कर्मचाऱ्यांच्या पगारातून थेट कपात करून पतसंस्थेच्या खात्यावर जमा केली जाते. मात्र, गेल्या चार महिन्यांपासून महानगरपालिका प्रशासनाकडून कर्मचाऱ्यांच्या कर्ज हप्त्यापोटी कपात करण्यात आलेली रक्कम पतसंस्थेला मिळालेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे पतसंस्था आर्थिक अडचणीत सापडली असून, महापालिकेकडे आतापर्यंत तब्बल ४ कोटी ३१ लाख ९१ हजार ३२० रुपये थकबाकी असल्याचे पतसंस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

महापालिका कर्मचाऱ्यांनी पतसंस्थेकडून घेतलेल्या कर्जाच्या हप्त्यांची रक्कम दरमहा त्यांच्या वेतनातून कपात केली जाते. ही कपात केलेली रक्कम पतसंस्थेच्या खात्यावर नियमितपणे जमा होणे अपेक्षित असताना गेल्या अनेक महिन्यांपासून ती वेळेवर मिळत नसल्याने संस्थेच्या आर्थिक व्यवहारांवर मोठा परिणाम झाला आहे. याबाबत पतसंस्थेने महापालिका प्रशासनाकडे वारंवार पत्रव्यवहार करून तसेच सातत्याने पाठपुरावा करूनही कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नसल्याचे संचालक मंडळाचे म्हणणे आहे.

पतसंस्थेला जिल्हा बँकेकडून सुमारे ३ कोटी रुपयांचे कॅश क्रेडिट कर्ज उपलब्ध होत असते. मात्र, सदर कॅश क्रेडिटची मर्यादाही संपल्याने पतसंस्थेसमोर आर्थिक अडचणी अधिक गंभीर झाल्या आहेत. सभासदांच्या कर्जाच्या हप्त्यांची कपात महापालिकेच्या माध्यमातून होत असतानाही ही रक्कम संस्थेला मिळत नसल्यामुळे कर्जवाटप व दैनंदिन आर्थिक व्यवहारांवर परिणाम होत असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

कपात केलेल्या कर्ज हप्त्यांची रक्कम तातडीने पतसंस्थेच्या खात्यावर जमा करावी, या मागणीसाठी पतसंस्थेच्या संचालक मंडळासह सभासदांनी महापालिका प्रशासकीय कार्यालयासमोर धरणे आंदोलन सुरू केले आहे. वारंवार पत्रव्यवहार व पाठपुरावा करूनही प्रश्न सुटला नसल्याने आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचे पतसंस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

यावेळी पतसंस्थेचे चेअरमन बाबासाहेब मुदगल यांनी महापालिकेकडून थकीत रक्कम तातडीने मिळणे गरजेचे असल्याचे सांगितले. महापालिका कर्मचाऱ्यांच्या पगारातून कर्जाच्या हप्त्याची रक्कम नियमितपणे कपात केली जाते; मात्र ती रक्कम पतसंस्थेला मिळत नसल्याने संस्था मोठ्या आर्थिक संकटात सापडली आहे.

# श्री छत्रपती शिवाजी महाराज चरित्र कथा सोहळ्याची कार्यक्रम पत्रिका विधीवत पूजन करून विशाल गणपती चरणी अर्पण

## गणपती बाप्पा मोरयाच्या गजरात पत्रिका वाटपाचा उत्साहात श्रीगणेशा



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** येथील श्री रामकृष्ण सेवा ट्रस्टच्या वतीने शहरात प्रथमच नवीन टिळक रोडवरील नंदनवन लॉन्समध्ये श्री छत्रपती शिवाजी महाराज चरित्र कथा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष संजय जाधव व सौ.मंगला जाधव या दाम्पत्याच्या हस्ते ग्रामदैवत श्री विशाल गणपती समोर कार्यक्रम पत्रिकेचे विधीवत पूजन करून गणपतीस कार्यक्रम पत्रिका देण्यात आली. वेदमूर्ती श्री.विजय क्षीरसागर, श्री.गणेश भालेराव व श्री. ओंकार जगनाडे यांनी पौरोहित्य केले.

श्री रामकृष्ण सेवा ट्रस्टचे उपाध्यक्ष मोहनलाल मानधना, सचिव सुरेश चांडक, कोषाध्यक्ष मगनभाई पटेल यांच्या हस्ते विशाल गणपती देवस्थानचे सचिव अशोकराव कानडे यांना कार्यक्रम पत्रिका देऊन वाटपाचा श्रीगणेशा करण्यात आला. यावेळी श्री.कानडे यांनी श्री रामकृष्ण सेवा ट्रस्टच्या कार्याचा गौरव करताना शहरात प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या श्री छत्रपती शिवाजी महाराज चरित्र कथा सोहळ्यास शुभेच्छा दिल्या.

यावेळी सर्वश्री पुरुषोत्तम पटेल, शरदराव झंवर, रामेश्वर बिहाणी, रविंद्र गुजराथी, पुरुषोत्तम नावंदर, नितीन मंत्री, डॉ. विजयकुमार भंडारी, मिलिंद चवंडके, हिरालाल पटेल, सोमनाथ नजान, बजरंग दरक, राजेंद्र खंडेलवाल, गोपाल मणियार, बाबुशेठ लोढा, कु.हर्षा गुजराथी आदी मान्यवर उपस्थित होते.

श्री रामकृष्ण सेवा ट्रस्टचे अध्यक्ष श्री नंदलाल मनियार यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली या सोहळ्याची जय्यत तयारी करण्यात आली आहे. दि. २९ सप्टेंबर २०२६ ला दुपारी ३ वाजता श्री छत्रपती शिवाजी महाराज चरित्र कथा सोहळ्याचा शुभारंभ शिवशाही थाटात करण्यात येणार आहे. अयोध्या येथील श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासचे महासचिव प.पू. श्री स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज यांच्या ओजस्वी वाणीतील शिवचरित्र कथा श्रवण करण्याचे भाग्य नगरकरांना लाभणार आहे.

दि. २९ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२६ दरम्यान दुपारी ३ ते सायंकाळी ७ या वेळेत कथा सोहळा चालेल. दि. ३ ऑक्टोबर २०२६ ला सकाळी ९ ते दुपारी १२ या वेळेत कथा होऊन सांगता केली जाईल. दि. २९ सप्टेंबरला पहिल्या दिवशी शिवजन्म पूर्व काळ, तत्कालीन परिस्थिती, शिवजन्म ते स्वराज्याची शपथ, संतकार्य. दि. ३० सप्टेंबरला दुसऱ्या दिवशी कान्होजी जेधे, जावळीचा वेढा, प्रतापगड युद्धनिती, अफझलखान वध, दि. १ ऑक्टोबरला तिसऱ्या दिवशी पावनखिंडीतील शौर्य, चाकणचा रणसंग्राम, लाल महालावर स्वारी (शाहिस्तेखानावर मात), प्रथम आरमार स्वारी, पुरंदरचा वेढा व तह. दि. २ ऑक्टोबरला चौथ्या दिवशी आग्रा येथून सुटका, छत्रसाल बुंदेला यांना प्रेरणा, सिंहगड अर्थात तानाजी मालुसरे शौर्यगाथा. दि. ३ ऑक्टोबरला पाचव्या दिवशी महाराजांचे विजय पर्व, शिवराज्याभिषेक, स्वराज्याची स्थापना, भारतव्यापी हिंदवी साम्राज्य अशा पद्धतीने कथा निरुपण होईल.

नंदनवन उद्योग समुहाचे श्री. संजय जाधव हे या सोहळ्याचे स्वागताध्यक्ष आहेत. मंचचे प्रायोजक शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फाउंडेशन असून दि. ३ ऑक्टोबरला होणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक सोहळ्याचे यजमानपद श्री. सुमित संतोष वर्मा हे भूषविणार आहेत. वैदिक पद्धतीने होणारा शिवराज्याभिषेक सोहळा खास आकर्षण ठरणार आहे. सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी विविध समित्यांचे संघटन करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास युवा पिढीने जाणून घेणे आजच्या काळात अत्यावश्यक आहे, म्हणून प्रथमच या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

नगरकरांनी विशेषतः युवकांनी दररोजच्या कथा निरूपणाचा लाभ मोठ्या संख्येने घ्यावा, असे आवाहन श्री रामकृष्ण सेवा ट्रस्टचे अध्यक्ष श्री. नंदलाल मणियार, उपाध्यक्ष श्री. मोहनलाल मानधना, सचिव श्री. सुरेश चांडक, कोषाध्यक्ष श्री. मगनलाल पटेल, विश्वस्त सर्वश्री पुरुषोत्तम पटेल, सुभाष जग्गी, श्रीगोपाल धूत, डॉ. विजय भंडारी, मधुसूदन सारडा, रवींद्र गुजराथी, शरद झंवर, हर्षल शहा, रामेश्वर बिहाणी, विजय पंजाबी तसेच निमंत्रित कार्यकारिणी मंडळ सदस्य सर्वश्री हिरालाल पटेल, पुरुषोत्तम नावंदर, विपुल शहा, बजरंग दरक, नितीन मंत्री, राहुल जामगांवकर, राजेश डागा, बालकिसन जाखोटिया, भगवान फुलसौंदर, सोमनाथ नजान, हर्षा गुजराथी, सल्लागार ॲड. शरद पलोड आणि डॉ. शरद कोलते या मान्यवरांनी केले आहे.

# निरोगी व सदृढ समाजाचे मिशन घेऊन आनंदऋषीजी हॉस्पिटलचे उपक्रम - वसंतलाल चोपडा

## आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये बालरोग व थॅलेसेमिया तपासणी शिबिरात बालकांची मोफत तपासणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** निरोगी व सदृढ समाजाचे मिशन घेऊन आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये सातत्याने विविध आरोग्यविषयक उपक्रम राबविले जात आहेत. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत रुग्णसेवा पोहोचविण्यासाठी विविध आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून सर्वसामान्यांना आधार देण्याचे काम सुरू आहे. बालकांचे विविध आजार व आरोग्य तपासण्या एका छताखाली उपलब्ध करून देत नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा देण्यात येत असल्याचे वसंतलाल चोपडा यांनी सांगितले.

जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटल अँण्ड मेडिकल रिसर्च सेंटरच्या वतीने स्व. विलास वसंतलाल चोपडा यांच्या स्मरणार्थ वसंतलाल चुनीलालजी चोपडा परिवाराच्या वतीने बालरोग व थॅलेसेमिया तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी वसंतलाल चोपडा बोलत होते. यावेळी सुभाष मुनोत, अलका मुनोत, संतोष बोथरा, प्रकाश छल्लाणी, सतीश लोढा, डॉ. वसंत कटारिया, माणकचंद कटारिया, बालरोग तज्ज्ञ डॉ. निखिल गुट्टे, डॉ. वैभवी वंजारे, डॉ. दिपी अग्रवाल, डॉ. लिझा बलसारा, डॉ. रुपेश सिकची आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात संतोष बोथरा म्हणाले की, आरोग्य सेवेतून आनंदऋषीजी हॉस्पिटल समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचले आहे. मोफत आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून समाजाच्या आणखी जवळ जाण्याचा प्रयत्न सुरू आहे. या आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून समाजाची सेवा करत हॉस्पिटलने सर्वसामान्यांच्या मनात मोठा विश्वास निर्माण केला आहे.

संपूर्ण राज्यातून रुग्ण आरोग्यसेवेसाठी आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये येतात. या सेवा कार्यात वसंतलाल चोपडा आणि सुभाष मुनोत परिवाराचे मोठे योगदान मिळत आहे. जैन सोशल फेडरेशनच्या खांद्याला खांदा लावून ते कार्य करत असून, जीवनाचा खरा आनंद आरोग्य सेवेतून घेत असल्याचे त्यांनी सांगितले. दर महिन्याला थॅलेसेमियाग्रस्त २१० बालकांना मोफत उपचार दिले जात असून, बालकांच्या विविध आजारांवरील उपचार सुविधा हॉस्पिटलमध्ये उपलब्ध असल्याची माहितीही संतोष बोथरा यांनी दिली.

डॉ. लिझा बलसारा म्हणाल्या की, थॅलेसेमिया ग्रस्त बालकांसाठी आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये मोफत उपचार सुविधा उपलब्ध आहे. इतर आजारांसाठी अल्पदरात विविध आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. तसेच बोन मॅरो ट्रान्सप्लांटही यशस्वी करण्यात आले असून, संबंधित बालक निरोगी जीवन जगत असल्याचे त्यांनी सांगितले.

बालरोग तज्ज्ञ डॉ. निखिल गुट्टे यांनी जन्मजात कमी वजनाच्या बालकांसाठी एनआयसीयू सेंटरमध्ये विशेष काळजी घेतली जाते. अशा बालकांची योग्य निगा राखून त्यांची उत्तम प्रकारे वाढ केली जाते. जिल्ह्यात सर्व सुविधायुक्त एनआयसीयू सेंटर आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये उपलब्ध असल्याची माहिती त्यांनी दिली.

(पान १ वरून)

## मनाने स्वच्छ, लोकाभिमुख भूमिका असलेले नेतृत्व हरपले - प्रा. राम शिंदे

जगताप यांना समाजरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. अरुणकाका नियमितपणे समाजाच्या जनसंपर्कात राहत होते. राजकीय जीवनात माझा त्यांच्याशी संपर्क आला आणि त्यातून ऋणानुबंध निर्माण झाले. त्यांचे राहणीमान आणि कार्यकर्त्यांवर जीवापाड प्रेम करण्याची त्यांची पद्धत याबद्दल आम्ही लांबून ऐकत होतो. मात्र त्यांच्या जवळ गेल्यानंतर त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील आपुलकी आणि जीव लावण्याची पद्धत अनुभवता आली.अरुणकाकांचे जाण्याचे हे वय नव्हते. ते कमी वयातच आपल्यातून निघून गेले, ही बाब कोणालाही पटणारी नव्हती. ते आजारी असताना त्यांना रुग्णालयात भेटण्यासाठी गेलो होतो. आजारी व्यक्तीच्या चेहऱ्यावर दुःख जाणवते; मात्र काका रुग्णालयातील बेडवर असतानाही त्यांच्या चेहऱ्यावर वेगळेच तेज दिसत होते. ते आत्ताच अंघोळ करून आले आहेत आणि लोकांमध्ये बसले आहेत, असेच त्यांच्याकडे पाहिल्यानंतर वाटत होते.ते नेहमीच मनाने स्वच्छ होते. त्यांनी घेतलेली भूमिका लोकाभिमुख राहिली. असे नेतृत्व आज आपल्यामध्ये नसल्याचे दुःख सर्वांना आहे. आमदार संग्राम जगताप आणि सचिन जगताप यांच्या माध्यमातून अरुणकाकांचा विचार जोपासला जात असून, त्यांची आदर्श भूमिका पुढे घेऊन जाण्याची गरज आहे, असे प्रा. शिंदे यांनी सांगितले.

पूर्वीच्या काळातील समाज, जात, धर्म या संकल्पनांमध्ये सर्वांना समंजसपणे सोबत घेऊन देशाची प्रगती व उन्नती साधण्याचा विचार होता. मात्र सध्याच्या काळात 'मी आणि माझा' अशी व्याख्या होत चालली आहे. चांगले काम करणारी माणसेच समाजाच्या लक्षात राहतात.

छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेचे राज्य निर्माण करून समाजासमोर आदर्श काम उभे केले. त्यामुळे ते आजही आपल्या स्मरणात आहेत. समाजामध्ये आपली ओळख निर्माण व्हावी यासाठी प्रत्येकाने चांगले काम उभे केले पाहिजे. पुरस्कारांच्या माध्यमातून चांगले काम करणाऱ्यांचा सन्मान होत असल्याने इतरांनाही चांगले काम करण्याची प्रेरणा आणि ऊर्जा मिळते.

मराठा सेवा संघ व मराठा सहकारी पतसंस्थेने पुरस्कार देऊन कर्तृत्ववानांचा सन्मान करण्याचा हाती घेतलेला उपक्रम कौतुकास्पद असल्याचे प्रा. राम शिंदे यांनी सांगितले. आयुर्वेद शास्त्र सेवा मंडळाचे अध्यक्ष ॲड. सचिन जगताप म्हणाले की, काकांचे कुटुंब हे केवळ रक्ताच्या नात्यातील कुटुंब नव्हते, तर संपूर्ण जनता हेच त्यांचे कुटुंब होते. काकांनी लोकांवरखूप प्रेम केले.आजही अनेक कार्यकर्ते हक्काने सांगू शकतात की, काकांना मिळालेला हा पुरस्कार स्वीकारण्याचा अधिकार आमचाही आहे. त्यामुळेच पुरस्कार स्वीकारण्यासाठी मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित आहेत. मराठा सेवा संघाने काकांना समाजरत्न पुरस्कार देऊन जो सन्मान केला, तो आम्ही स्वीकारला असून त्याबद्दल समाजाचे ऋण व्यक्त करतो. काका ज्या पद्धतीने समाजासाठी काम करायचे, त्याच पद्धतीचा वारसा पुढे घेऊन जाण्याचा प्रयत्न करू, असे ॲड. सचिन जगताप यांनी सांगितले. कार्यक्रमात विविध मान्यवरांनी स्वर्गीय अरुणकाका जगताप यांच्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी माजी महापौर बाबासाहेब वाकळे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, स्थायी समितीचे माजी सभापती कुमारसिंह वाकळे, अविनाश घुले, प्रा. माणिकराव विधाते, मर्चंट बँकेचे चेअरमन संजय चोपडा, नगरसेवक प्रकाश भागानगरे, निखिल वारे, महेश तवले, ज्ञानदेव पांडुळे, डॉ. सागर बोरुडे, जालिंदर कोतकर, मयूर कुलथे, धर्मा करंडे, श्रीकांत अष्टेकर, दत्ता गाडळकर, गोरख पडोळे, प्रा. अरविंद शिंदे, महेश लोंढे, मनीष फुलडाळे आदी उपस्थित होते. यावेळी सामाजिक तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. समाजातील कर्तृत्ववान व्यक्तींचा गौरव करण्याच्या या उपक्रमाला समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून प्रतिसाद दिला.

## न्याय मिळेपर्यंत संघर्ष करत राहणार - प्रा. लक्ष्मण हाके

न्याय देण्याची दिसत नाही. त्यामुळे हा संघर्ष तीव्र करून मोठ्या प्रमाणात आंदोलन करणे आवश्यक आहे. त्यांनी समाजाला आवाहन केल्यानंतर विविध समाजातील ५०च्यावर तरुणांनी आमरण उपोषणाला बसण्याची तयारी दाखवली.     परशुराम हिंदू सेवा संघाचे श्री. विश्वजीत देशपांडे यावेळी म्हणाले, १९५३ला 'इनाम अबॉलीजमेंट कमिशन'ने देवस्थान इनामधारक शेतकर्यांवर प्रचंड मोठा अन्याय केला व तो आजतागायत दूर झालेला नाही. संविधान शेतकर्यांच्या बाजूने आहे, परंतु राज्यकर्त्यांना याचे गांभीर्य नाही. हा लढा अधिक तीव्रतेने लढल्याशिवाय यश मिळणार नाही. शासनाने हीच भूमिका रेटल्यास उच्च न्यायालयात जाण्याची तयारीदेखील ठेवावी लागेल.

दशनाम गिरीगोसावी समाजाचे ओमप्रकाश गिरी म्हणाले, गावागावात संख्येने छोट्या असलेल्या समाजावर बळाचा वापर करून जमिनी ताब्यात घेऊन इनामधारक शेतकर्यांना हुसकावून लावले जात आहे. आमचे हक्क व अधिकारांसाठी या कृती समितीच्या माध्यमातून मोठा लढा उभारला जात आहे. यश मिळेपर्यंत आम्ही शांत बसणार नाही.मराठवाडा इनाम हक्क परिषदेचे ॲड. राजेंद्र बन यावेळी बोलताना म्हणाले, शासनाला कायदा करताना आमचा विचार करावाच लागेल; अन्यथा राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात मोठी आंदोलने, उपोषणे होतील. देव, देश, धर्माची सेवा करणार्या या छोट्या समाज घटकांना न्याय दिलाच पाहिजे. गंगाखेडचे आमदार श्री. रत्नाकर गुट्टे हे काही कारणाने या मेळाव्यास उपस्थित राहू शकले नाहीत, परंतु त्यांनी दृकश्राव्य माध्यमातून उपस्थितांशी संवाद साधला. लवकरच हा प्रश्न घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे प्रश्न मांडण्याचे आश्वासित केले.राज्यातील सर्व जिल्ह्यांमधून १५ हजारांच्यावर देवस्थान इनामधारक शेतकर्यांनी या मेळाव्याला उपस्थिती लावली. मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी सर्वश्री अरविंद कुलकर्णी, गजानन जोशी, ऋषिकेश सुमंत, रंगनाथ गुरव, सचिन रेणुकर, संतोष वाघमारे, श्रद्धा साखरे, भारत पुरी, सचिन गिरी, संजीव भारती, श्री. महंत दत्तात्रय गिरी महाराज, राज्य उपाध्यक्ष अवधूत गिरी, जगदेव गिरी, राज्य मीडियाप्रमुख रवी बन, प्रा. मकरंद गिरी, पंडित गोसावी, अनुप गोसावी (नाशिक), सूर्यभान गोसावी (नाशिक), वसंत रामभारती गोसावी (सिन्नर), मुना गिरीगोसावी (पंढरपूर), सूर्यकांत गिरीगोसावी, प्रकाश भारती, धन्यकुमार पुरी पाटील, भास्करगिरी, योगेश गिरी, राजू गिरी, खोलेश्वर नंद, भारत पुरी, सिद्धेश्वर गिरी, संजीव भारती, बाजीराव गिरी आदींनी परिश्रम घेतले. गोपनीय माहिती प्राप्त झाल्याची वेळ, स्टेशन डायरीतील नोंदी, पंचांना बोलाविण्याचा कथित घटनाक्रम आणि  फुटेजमधील प्रत्यक्ष हालचालींची क्षणाक्षणाची पडताळणी केल्यास या कारवाईमागील सत्य समोर येऊ शकते. त्यामुळे संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# ऐन हळदीच्या दिवशी बैलजोडीचा मृत्यू!

## रहाटगावच्या शेतकरी कुटुंबावर संकट; भुमरे यांच्या मार्गदर्शनाखाली मदतीचा हात

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** मुलीच्या लग्नाची लगबग... घरात हळदीचा कार्यक्रम सुरू असतानाच रहाटगाव येथील शेतकरी किशोर डोईफोडे व त्र्यंबक डोईफोडे यांच्या बैलजोडीचा अचानक मृत्यू झाला. आनंदाच्या क्षणी घडलेल्या या दुर्दैवी घटनेने डोईफोडे कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला.

दुष्काळी परिस्थितीमुळे आधीच आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या शेतकरी कुटुंबाला बैलजोडीच्या मृत्यूचा मोठा आर्थिक फटका बसला. शेतीचा आधार असलेली बैलजोडी गमावल्याने कुटुंबासमोर नवे संकट उभे राहिले. ऐन मुलीच्या लग्नाच्या दिवशी घडलेल्या या घटनेने परिसरातील शेतकरीही हळहळले.

घटनेची माहिती मिळताच खासदार संदीपान भुमरे व आमदार विलास बापू भुमरे यांच्या मार्गदर्शनाखाली दावरवाडी जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र वाघमोडे, पंचायत समिती सदस्य डॉ. भारत झारगड तसेच छत्रपती संभाजीनगर जिल्हा ग्रामपंचायत अधिकारी पतसंस्थेचे माजी चेअरमन



जिजाभाऊ मिसाळ यांनी डोईफोडे कुटुंबाची भेट घेत आर्थिक मदत केली.

**संकटात माणुसकी धावली!**

शेतकऱ्याच्या अडचणीच्या काळात मदतीचा हात देत पदाधिकाऱ्यांनी कुटुंबाला आधार दिला. 'संकटात शेतकऱ्याच्या पाठीशी उभे राहणे हीच खरी माणुसकी', अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

यावेळी मिठू तात्या नन्नावरे, गोपीचंद पडळकर, सोशल मीडिया संपर्कप्रमुख जगदीश वीर, वडवाळीचे उपसरपंच योगेश पाचे, रहाटगावचे माजी सरपंच भाऊसाहेब गोरे, किशोर शिंदे, डॉ. बद्रीनाथ बोबडे, हरिश्चंद्र डोईफोडे, संभाजी वीर, आसाराम डोईफोडे, सोमा तोतरे, गणेश काळे, माऊली तळपे, अफजल पठाण, सोमनाथ औटे, मच्छिंद्र खराड आदी उपस्थित होते.

(पान १ वरून)

## सभासदांना ५१०० रूपयांच्या ठेव पावतीची भेट देणार – संजय चोपडा

आवश्यक तरतुदी केल्यानंतर सभासदांना १५ टक्के लाभांश दिला आहे . सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त सभासदांना ५१०० रूपयांच्या ठेव पावतीची संस्मरणीय भेट दिली जाणार असून यासाठी आवश्यक परवानगी मिळाली आहे. या परवानगीसाठी आमदार संग्राम जगताप, त्यांचे स्वीय सहाय्यक अनुप काळे, सभासद राजेंद्र गांधी, बँकेचे प्रभारी सीईओ नितीन भंडारी यांचे तसेच राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचेही विशेष सहकार्य लाभले.  बचत ठेव खातेदारांच्या अपघाती  निधनामुळे त्यांच्या वारसदारांना प्रत्येकी रक्कम रूपये २ लाख प्रमाणे देण्यात आलेली आहे. आजच्या डिजिटल युगात ग्राहकांना जलद, सुरक्षित आणि आधुनिक बँकिंग सेवा मिळणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने आपल्या बँकेने सर्व प्रकारच्या डिजिटल सेवा-सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. बँक एक मोठी आर्थिक संस्था म्हणून उभी असून अहिल्यानगरच्या वाटचालीमध्ये बँकेचा फार मोठा वाटा आहे. हस्तीमलजी मुनोत म्हणाले, उत्कृष्ट आर्थिक कारभाराची परंपरा बँकेने सातत्याने कायम राखली आहे. सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त सभासदांना संस्मरणीय भेट देण्यात बँक यशस्वी झाली आहे. जैन कॉन्फरन्सचा राष्ट्रीय सन्मान मिळणे माझ्यासाठी मोठा बहुमान आहे. सामाजिक, धार्मिक, आर्थिक क्षेत्रात काम करताना अनेकांचे सहकार्य लाभत असते.  बँकेचे सर्व सहकारी संचालक, अधिकारी, कर्मचारी, सभासद यांचीही मोलाची साथ मला कायम मिळाली आहे.  वार्षिक सभेत सभासदांनी उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांना समाधानकारक उत्तरे देण्यात आली. शेवटी व्हाईस चेअरमन अमित मुथा यांनी आभार मानले.

## भिंगारला २ एफएसआयची मंजुरी

त्यामुळे आता संरक्षण मंत्रालयाकडून २ एफएसआयला मिळालेली मंजुरी हा भिंगारच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. आतापर्यंत केवळ १ एफएसआय लागू असल्याने उपलब्ध जागेवर गरजेनुसार बांधकाम करण्यावर मर्यादा होत्या. वाढती कुटुंबे, बदलत्या गरजा आणि बांधकामाच्या मर्यादा यामुळे अनेक मालमत्ताधारक अडचणीत होते. आता एफएसआय दुप्पट झाल्यामुळे नियमानुसार अधिक बांधकाम करण्याचा मार्ग मोकळा होणार असून, भिंगार परिसराच्या नागरी विकासालाही चालना मिळण्याची शक्यता आहे. या निर्णयासाठी भिंगार कँटोन्मेंट परिसरातील नागरिक, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी आणि संबंधित प्रशासनाकडूनही सातत्याने पाठपुरावा करण्यात आला होता. कँटोन्मेंट बोर्डाचे तत्कालीन मुख्याधिकारी मोरे आणि नामनिर्देशित सदस्य वसंत राठोड यांनी बिल्डिंग बायलॉजमध्ये बदल करण्याचा ठराव करून एफएसआय वाढविण्याची मागणी केंद्र सरकारकडे केली होती. या मागणीच्या पाठपुराव्यालाही आता यश आले आहे. या महत्त्वपूर्ण निर्णयासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार संग्राम जगताप यांच्यासह कँटोन्मेंट बोर्डाचे अध्यक्ष ब्रिगेडियर पी. सुनीलकुमार, मुख्याधिकारी प्रिया पुरोहित, अभियंता अशोक फुलसुंदर आणि प्रवीण बागल यांचे सहकार्य लाभल्याबद्दल आभार व्यक्त करण्यात आले आहेत. भिंगारवासीयांच्या दीर्घकाळ प्रलंबित प्रश्नाला आता धोरणात्मक निर्णयामुळे दिशा मिळाली असून, लोकसभेपासून स्थानिक पातळीपर्यंत सातत्याने मांडला गेलेला एफएसआयचा प्रश्न अखेर निर्णयाच्या टप्प्यावर पोहोचला आहे. त्यामुळे भिंगारच्या नियोजित नागरी विकासाला आणि मालमत्ताधारकांच्या बांधकामाच्या गरजांना आता अधिक व्यापक अवकाश मिळणार आहे.

## चार पोलीस कर्मचाऱ्यांची तडकाफडकी बदली

झाल्याची वेळ, स्टेशन डायरीतील नोंदी, पंचांना बोलाविण्याचा कथित घटनाक्रम आणि फुटेजमधील प्रत्यक्ष हालचालींची क्षणाक्षणाची पडताळणी केल्यास या कारवाईमागील सत्य समोर येऊ शकते. त्यामुळे संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

विशेष पोलीस महानिरीक्षकांसमोर फुटेज सादर

शेख यांनी २२ सप्टेंबर २०२६ रोजी नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक संजय ऐनपुरे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन संबंधित  फुटेज दाखविले होते. पोलिसांच्या अधिकृत कागदपत्रांतील वेळा, स्टेशन डायरीतील नोंदी आणि  मधील घटनाक्रम यांतील कथित विसंगती त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आली.त्यानंतर प्राथमिक चौकशीचे आदेश देण्यात आले. संबंधित कर्मचारी कोतवाली पोलीस ठाण्यात कार्यरत राहिल्यास चौकशी प्रक्रियेवर परिणाम होऊ नये, या पार्श्वभूमीवर चार कर्मचाऱ्यांची तात्पुरती बदली करण्यात आल्याचे आदेशातून स्पष्ट होत आहे

पोलीस उपनिरीक्षक गणेश देशमुख यांच्यावर कारवाई कधी?

या प्रकरणात पोलीस उपनिरीक्षक गणेश देशमुख तसेच पोलीस कर्मचारी रोहिणी दरंदले, दीपक रोकले, अतुल काजोळ आणि पल्लवी रोकले यांच्या भूमिकेची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र, सध्याच्या बदली आदेशात गणेश देशमुख यांचा समावेश नसल्याने त्यांच्या भूमिकेबाबत वरिष्ठ पोलीस प्रशासन कोणता निर्णय घेणार, याकडे लक्ष लागले आहे.

डिजिटल पुरावे तातडीने सुरक्षित करण्याची मागणी

घटनास्थळ व परिसरातील मूळ //, कोतवाली पोलीस ठाण्यातील  चित्रण, स्टेशन डायरी, ई-साक्ष नोंदी, वायरलेस लॉग, शासकीय वाहनांचे  रेकॉर्ड तसेच संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांचे ,  आणि मोबाईल स्थानमाहिती तातडीने जप्त व सुरक्षित करण्याची मागणी करण्यात आली आहे.

सादर करण्यात आलेल्या  फुटेजची शासकीय डिजिटल न्यायवैद्यक प्रयोगशाळेकडून तपासणी करून त्याची सत्यता, सलगता, मूळ वेळ आणि संभाव्य छेडछाड याबाबत अधिकृत अहवाल घेण्याची मागणीही कायम आहे.

उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्याची तयारी

चार पोलीस कर्मचाऱ्यांच्या बदल्या हा तक्रारीनंतर झालेला महत्त्वपूर्ण प्राथमिक निर्णय असला, तरी केवळ बदलीवर हे प्रकरण थांबवू नये. सर्व डिजिटल आणि दस्तऐवजी पुराव्यांची वैज्ञानिक तपासणी करून संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बीएनएस), एनडीपीएस कायदा आणि अन्य लागू कायद्यांनुसार गुन्हा दाखल करण्यात यावा, यासाठी सातत्याने पाठपुरावा केला जाणार आहे. या प्रकरणात लवकरच मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल करण्यात येणार असल्याचे शेख यांनी सांगितले.